**सं.फौ.प्र.क्र. ७२९/२०२४**
**सरकार–वि– संदिप**
**नि.क्र.११ वर पुढे सुरु**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१,

मी शपथेवर खरे सांगतो की,
नावः – खुशाल अभिमन मुंगमोडे, वय ३५ वर्ष,
कामधंदा – शेती, रा. उमरी, तह. साकोली, जि. भंडारा.

**<u>साक्षीदाराचा सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी अधिवक्ता श्री. तौसिफ खान यांच्यामार्फत</u>**

पोलीसांनी मला दि.०२/०९/२०२४ रोजी पंचनाम्याच्या कार्यवाही करीता बोलाविले किंवा कसे मला माहिती नाही. मी शेतावरुन जात असतांना पोलीसांनी आवाज देवून बोलाविले होते. पोलीसांनी माझी सुचनापत्र, घटनास्थळ, जप्ती पंचनाम्यावर सही घेतली होती. आता मला अभिलेखावरील सुचनापत्र, घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. माझी पंच क्र.१ म्हणून सह्या असून मजकुर मला माहित नाही. माझ्या सहीला अनुक्रमे **नि.क्र.१३ ते १५** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने न्यायालयाच्या परवानगीने साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०२/०९/२०२४ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याच्या कार्यवाही करीता मौजा उमरी येथे आरोपीच्या घरी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातून एकूण १० नग प्रत्येकी १८० मिलीचे पव्वे जप्त करुन त्याचा जप्ती पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष रासायनिक परिक्षणाकरीता जप्त मुद्देमालातील १८० मि.ली. दारु वेगळी काढुन सिलबंद केली होती. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर आरोपीने सही केली होती. त्यानंतर मी पण सही केली होती. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. जप्ती पंचनाम्याला **निशाणी क्र.१६** देण्यात येते. हे म्हणने खरे आहे की, त्या दिवशी घटनास्थळ पंचनामा करतेवेळी छायाचित्र काढले होते. त्या छायाचित्रामध्ये मी, आरोपी व जप्त दारु दिसत आहे. ते बरोबर आहेत. त्यास **निशाणी क्र.१७ ते २०** देण्यात येते.

**<u>सरतपास समाप्त.</u>**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे अधिवक्ता श्री. पी. डब्लू. खोब्रागडे यांच्यामार्फत–</u>**

३. हे म्हणने खरे आहे की, पोलीसांनी मला कोणतेही सुचनापत्र दिले नव्हते. हे म्हणने खरे आहे की, पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ जप्तीची कार्यवाही केली नव्हती. हे म्हणने खरे आहे की, घटनास्थळ जप्ती पंचनाम्यात काय लिहिले पोलीसांनी मला वाचून दाखविले नाही मी सुध्दा वाचले नाही.

हे म्हणने खरे आहे की, आरोपीने माझ्यासमक्ष कोणतीही सही दिली नव्हती. फोटो काढतांना मी तिथे होतो. फोटो कोणी काढले हे मला माहित नाही. बॉटल कोणत्या कंपनीचे होते व खाली होते किंवा कसे हे मला माहिती नाही. हे म्हणने खरे नाही की, आरोपीशी पटत नसल्यामुळे खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण–</u>**

**<u>फेरतपास काही नाही–</u>**

समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत

VISHAL MAHANAND GAIKWAD

Digitally signed by VISHAL MAHANAND GAIKWAD
Date: 2025.07.30 12:27:51 +0530

**(व्ही.एम. गायकवाड)**
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, साकोली.
२९/०७/२०२५